## *पोलीस उप अधीक्षक पदाच्या प्रशिक्षणास हजर राहणाऱ्या प्रशिक्षणार्थीना मार्गदर्शक सूचना*

1. *पोलीस उप अधीक्षक प्रशिक्षणासाठी महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक येथे हजर होणाऱ्या उमेदवारांनी प्रशिक्षणासाठी दिनांक १०.०९.२०१७ रोजी १४.०० वाजेपावेतो हजर रहावे.*
2. *पोलीस उप अधीक्षक पदासाठी प्रशिक्षणास हजर होणाऱ्या उमेदवारांनी विहीत वेळेत व दिनांकास महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक येथे हजर राहणे बंधनकारक आहे.*
3. ***प्रशिक्षणार्थीना प्रशिक्षण कालावधीत केवळ खालील नमूद स्पर्धात्मक परीक्षांनाच बसण्यास परवानगी देण्यात येईल .***

***३.१) a) महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत (MPSC) घेण्यात येणारी राज्य नागरी सेवा परीक्षा (State Civil Service Examination) (सध्याच्या पदांपेक्षा वरीष्ठ पदांसाठीच केवळ)***

***b) केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत (UPSC) घेण्यात येणारी नागरी सेवा परीक्षा (Civil Service Examination)***

***c) भारतीय वन सेवा परीक्षा***

*या बाबतचे **undertaking** सर्व परि.पोलीस उप अधीक्षक यांना देणे आवश्यक राहील. त्यानंतरच त्यांना परिक्षेसाठी रजा देण्यात येईल. इतर परिक्षांसाठी परवानगी देण्यात येणार नाही.*

3.2) *स्पर्धा परीक्षेला बसणाऱ्या परि.पोलीस उप अधीक्षक यांनी नाशिक हेच परीक्षा केंद्र त्यांच्या अर्जात नमूद करावे. केवळ नाशिक या परीक्षा केंद्रावरच प्रशिक्षणादरम्यान परिक्षेस बसण्याची परवानगी देण्यात येईल. परीक्षेसाठी नाशिक केंद्र नसल्यासच मुंबई केंद्र निवड करावे. या परिक्षेसाठी शनिवारी संध्याकाळी मुख्यालय सोडण्याची परवानगी दिली जाईल. परिक्षा देवून प्रशिक्षणार्थी हे रविवारी संध्याकाळी म.पो.अ., येथे प्रशिक्षणासाठी हजर होतील. याव्यतिरिक्त इतर केंद्र निवडल्यास परीक्षेस बसण्याची परवानगी दिली जाणार नाही.*

4. *अकॅडमीमध्ये प्रशिक्षणार्थीनी इस्त्री, हिटर, स्टिमर, किटली, टोस्टर आदी उपकरणे सोबत आणू नयेत.*
5. *प्रशिक्षण कालावधीत प्रशिक्षणार्थीना वैद्यकीय कारणास्तव २० दिवसापेक्षा जास्त परावर्तीत रजा मंजूर करता येणार नाही. त्यापेक्षा जास्त रजा गणना होत असल्यास*

आवश्यक प्रस्ताव पुढील कार्यवाहीसाठी शासनास सादर करण्यात येईल. अन्यथा परिविक्षाधीन कालावधी वाढविणेत येईल.

6. प्रशिक्षण कार्यक्रम पूर्ण १ वर्ष कालावधीचा असल्याने इतर रजा देण्यात येणार नाहीत. प्रशिक्षण कालावधीत १ दिवसांची गैरहजेरीसुध्दा शिस्तभंग विषयक कार्यवाहीस कारणीभूत ठरू शकते याची संबधित उमेदवारांनी नोंद घ्यावी.
तसेच संचालकाधीन मूल्यमापनाचे गुणांमध्ये कपात केली जाईल.

7. महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक येथे हजर झाल्यानंतर उमेदवारांना अकॅडमीतील सेंट्रल स्टोअर्समधून खालील साहित्य पुरविण्यात येईल. त्यासाठीची वजाती संबंधितांच्या वेतनातून करण्यात येईल.

अ) गणवेष साहित्य - (म.पो.अ., सेंट्रल स्टोअर्स येथून पुरविण्यात येणारे साहित्य)

| | | |
|---|---|---|
| 1. | Khaki shirts | - ४ |
| 2. | Khaki slacks | - ४ |
| 3. | Beret Cap | - २ |
| 4. | pair of ammunition boots (brown) | - १ |
| 5. | Oxford type brown shoes | - २ |
| 6. | Khaki Nylon Socks | - ४ |
| 7. | Khaki Coats (Tunic) | - १ |
| 8. | Khaki Tunic Shirt | - १ |
| 9. | Tie (dark blue, tricot) & Scarf | - १ each |
| 10. | Button set for Tunic | - १ |
| 11. | Tunic hook-pair | - १ |
| 12. | Peak Cap | - २ |
| 13. | Web belt khaki | - १ |
| 14. | Leather belt | - १ |
| 15. | Whistle cord khaki | - २ |
| 16. | Whistle thunder | - २ |
| 17. | मपोसे Badge (Cap Badge & Shoulder) | - ३ |
| १८. | Insignia (on uniform) | - ४ |
| १९. | Cane | - १ |
| 20. | Cross Belt | - १ |
| 21. | Sword & Knot/Frog | - १ |
| 22. | Name Plate of Uniform pattern | - २ |
| 23. | White T Shirts | - ४ |
| 24. | White P.T. Shoes, | - २ |
| 25. | White Half pants | - ४ |
| 26. | White Socks | - ३ |

27. *Khaki Woolen Socks* - २
28. *Plastic Bucket* - १
29. *Blazer Suit &Grey Pant* - १each
30. *Crest* - १
31. *Woolen Jersey Khaki* - १
32. *Angola Shirt* - १
33. *Yoga Mat* - १

**8.** *वर नमूद साहित्याव्यतिरिक्त प्रशिक्षणासाठी व नव्या प्रकारच्या अभ्यासासाठी आवश्यक ते साहित्य अकॅडमीतील सेंट्रल स्टोअर्समधून प्रशिक्षणार्थींना पुरविण्यात येईल व त्यासाठीची वजाती संबंधीतांच्या वेतनातून करण्यात येईल. सेंट्रल स्टोअर्स येथे उपलब्ध असणारे साहित्य प्रशिक्षणार्थींनी सोबत आणू नये.*

**9.** *महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, नाशिक येथील मेसमध्ये प्रशिक्षणार्थींना राहण्याची व जेवणाची व्यवस्था आहे. प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण कालावधीत वेतन व भत्ते मिळणारआहेत. त्यांचा मेसमध्ये होणारा खर्च त्यांच्या वेतनातून वजाती करण्यात येईल. मेस सहकार तत्वावर चालविण्यात येते.*

10. *प्रशिक्षणार्थींना महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, नाशिक येथे हजर झाल्यानंतर रूपये ५०००/- गणवेश अनुदान शासन नियमानुसार मंजूर करण्यात येईल.*

11. *प्रशिक्षण कालावधीत परि.पोलीस उप अधीक्षक यांनी अकॅडमीचे नियमांचे पालन करणे बंधनकारक आहे. परि.पोलीस उप अधीक्षक हे प्रशिक्षणास हजर झाल्यानंतर त्यांना नियम समजावून सांगण्यात येतील. प्रशिक्षणार्थी यांनी महाराष्ट्र पोलीस नियमावलीतील नियम ४३८ अन्वये नियमांचे (कर्तव्ये व प्रशिक्षण विषय) पालन करणे बंधनकारक आहे. कसूरी केल्यास महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ मधील नियमांप्रमाणे कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.*

12. *प्रशिक्षणास हजर होताना प्रशिक्षणार्थींनी प्राथमिक खर्च व मेस ॲडव्हान्ससाठी रु.१२०००/- (बारा हजार फक्त)सोबत आणावेत.*

13. *उमेदवारांनी प्रशिक्षणास हजर होणेपूर्वी स्वत:चे आधार कार्ड व पॅन कार्ड च्या छायांकीत प्रती सादर कराव्यात. जेणेकरुन दरमहाचे वेतन व भत्ते काढण्यास भविष्यात कोणत्याही अडचणी निर्माण होणार नाहीत.*

**14.** *सर्व प्रशिक्षणार्थी व ज्या प्रशिक्षणार्थींना चश्मा असल्यास नंबरचा व गॉगल ग्लासचा चष्मा न वापरता प्लेन चष्मा वापरुन फोटो **White & White** ड्रेसवर **red background** असलेल्या व दोनही कान पूर्ण दिसतील असे चेहरा समोर ठेवून काढावेत. जेणेकरुन प्रशिक्षणास हजर झालेवर प्रशिक्षणार्थीचे ओळखपत्र देता येईल.*

15. *प्रशिक्षणार्थींनी प्रशिक्षण कालावधीत मौल्यवान/ किमती वस्तू (दागदागीने, महागडे गॉगल्स, वाहने, महागडे घडयाळ, इ.) स्वत: सोबत बाळगू नयेत.*

**16.** *अकॅडमीमध्ये प्रशिक्षणादरम्यान घेण्यात येणाऱ्या अंतीम परीक्षेचे उत्तरपत्रिका परीक्षेचा निकाल प्रसिध्द झाल्यानंतर ज्या प्रशिक्षणार्थींना गुणांविषयी शंका आहे, त्यांनी लेखी निवेदन केल्यानंतरच ७ दिवसाचे आत महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, नाशिक येथे बघू शकतील.*

17. *प्रशिक्षणादरम्यान महिन्याचा दूसरा व चौथा शनिवार हा कामकाजाचा दिवस आहे, याची नोंद घ्यावी.*

18. *प्रशिक्षण काळामध्ये प्रशिक्षणार्थींनी शक्यतो स्वत:चे विवाह आयोजित करु नये. प्रशिक्षणानंतर विवाह कार्यक्रम ठेवावे. जर धार्मिक अथवा इतर टाळता न येणाऱ्या कारणासाठी विवाह विधी करणे अत्यावश्यक असेल तर नाशिक येथेच रविवारचे दिवशी विवाह करणे उचित राहील. अशा प्रकरणात रविवार जोडून एक दिवस रजा देण्यात येईल.*

19. *अकॅडमीतील **Leave policy** नुसार केवळ आई-वडील/पत्नी-पती/ मुलगा-मुलगी **(First blood relationship)** यांचे मृत्यु/गंभीर आजारपणासाठीच रजा देणेबाबत विचार करण्यात येईल. आजी-आजोबा, काका-काकू, मामा-मामी, आत्या-मावशी यासारखे इतर नातेवाईकांचे आजारपण व लग्नसोहळयांकरीता रजा देण्यात येणार नाही.*

20. *सदर मार्गदर्शक सूचना व मार्गदर्शक सूचनांसोबतची सहपत्रे **www.mahapolice.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.*

21. *प्रशिक्षणार्थी यांनी सोबत e-प्रशिक्षणासाठी **Laptop** आणावा.*

22. *प्रशिक्षणादरम्यान अकॅडमीचे बाहेर राहता येणार नाही तसेच अकॅडमी अगर अकॅडमी जवळ परिसरात त्यांचे पत्नीस ठेवता येणार नाही. तसेच परि.पोलीस उप अधीक्षक यांचे पाहुणे (guest) यांना अकॅडमीत राहण्याची परवानगी राहणार नाही.*

23. *प्रशिक्षणास हजर होते वेळी यशदा पुणे येथून मोकळीक केल्याबाबतचे पत्र सादर करणे आवश्यक आहे. मोकळीक मेमो सादर केल्याशिवाय प्रशिक्षणास हजर करुन घेण्यात येणार नाही.*

*(डॉ.जालिंदर सुपेकर)*
*उपसंचालक (प्रशिक्षण)*
*संचालक, महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, नाशिक*
*यांचेकरीता*